जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक -५४९ दिनांक - १५/०७/२०२३

युनिट-५, गुन्हे शाखा,पुणे शहर

# मुंढवा येथील आय.सी.आय.सी.आय. बँकेचे ए.टी.एम. फोडुन चोरी करणारे सराईत गुन्हेगारांना २४ तासात जेरबंद,

दि.१३/०७/२०२३ पहाटेच्यावेळी केशवनगर, मुंढवा येथील आय.सी.आय.सी.आय. बँकेचे ए.टी.एम.चे लॉक तोडुन त्यामध्ये घुसुन आतील एक्साईट कंपनीच्या बॅटऱ्या चोरी करुन गुन्हेगार पळुन गेलेबाबत बँकेचे प्रभारी यांनी तक्रार दिल्यावरुन मुंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं.२३२/२०२३, भा.दं.वि. कलम ४५७, ३८० असा गुन्हा दाखल होता.

सदर गुन्ह्याची माहिती मिळताच गुन्हे शाखेकडील युनिट ५ कडील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट देऊन वरिष्ठांच्या आदेशान्वये सदर गुन्ह्याचा समांतर तपास चालु केला असता त्यामध्ये संशयीत इसमांचे सी.सी.टि.व्ही. फुटेज प्राप्त झाले त्या आधारे तपास करता सी.सी.टि.व्ही. फुटेजमधील संशयीत इसम हा रेकॉर्डवरील बॅटऱ्या चोरी करणारा गुन्हेगार असुन त्याने मुंढवा, वारजे माळवाडी, चतु:श्रृंगी, ऊरळी कांचन व हडपसर अशा वेगवेगळ्या परिसरातील बँकेचे ए.टी.एम. फोडुन तेथील बॅटऱ्या चोरी केलेल्या आहेत.

सदर गुन्हेगार व त्याचा साथीदार हे त्यांचेकडील पांढऱ्या रंगाच्या सेन्ट्रो कारमधुन त्यांनी चोरी केलेल्या बॅटऱ्या विक्री करणेकामी चौधरी वस्ती, खराडी, पुणे येथे येणार आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाली. युनिट कडील स्टाफने चौधरी वस्ती, खराडी, पुणे येथे सापळा लाऊन नमुद आरोपीतांना शिताफीने पकडुन गुन्हयातील चोरीस गेलेल्या बॅटरीसह ताब्यात घेतले. त्यांची नावे **१) भगवान विश्वनाथ सदार, वय- ३८ वर्षे, रा. स.नं. ९/१, ओंकार कॉलनी, पिंपळे गुरव, पुणे व मुळगाव मु.पो. चतारी, ता. पातुर, जि. अकोला व २) सुभाष सुरेश सदार, वय- २६ वर्षे रा. मु.पो. चतारी, ग्रामीण रुग्णालयाच्या मागे, ता. पातुर, जि. अकोला**, असे असल्याचे सांगितले. सदर इसमांकडे कसोशीने तपास करता त्यांनी ३ बॅटऱ्या या मुंढवा पो.स्टे. गु.र.नं. २३२/२०२३, भा.दं.वि. कलम ४५७, ३८० या गुन्हयातील असल्याचे निष्पन्न झाले तसेच नमुद आरोपी यांनी खालील प्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असुन ते पुढील प्रमाणे

१. मुंढवा पो.स्टे. गु.र.नं. २३२/२०२३, भा.दं.वि. कलम ४५७, ३८०
२. वारजेमाळवाडी पो.स्टे.गु.र.नं. २९२/२०२१ भा.द.वि.कलम ३८०
३. चत:श्रृंगी पो.स्टे.गु.र.नं.२३३/२०२२ भा.द.वि.कलम ३८०, ४२७,५११
४. लोणीकाळभोर पो.स्टे.गु.र.नं.१७९/२०२१ भा.द.वि.क ३८०, ५११
५. हडपसर पो.स्टे.गु.र.नं. १६१५/२०२० भा.द.वि.क ३८०, ५११, ३४

नमुद आरोपींकडुन गुन्ह्यात वापरलेली गाडी व चोरीस गेलेल्या बॅटऱ्या असा एकुण १,५९,०००/- रु. किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त श्री रितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त, श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,श्री. रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप आयुक्त, श्री. अमोल झेंडे, मा.सहायक पोलीस आयुक्त, श्री. सतिश गोवेकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम, सहायक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर व पोलीस अंमलदार रमेश साबळे, दया शेगर, आश्रुबा मोराळे, चेतन चव्हाण, प्रताप गायकवाड, अमित कांबळे यांनी केलेली आहे.